## उपोद्घात

भारताच्या नियंत्रक व महालेखापरीक्षकांचा हा अहवाल भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 151 अंतर्गत महाराष्ट्राच्या राज्यपालांना सादर करण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

अहवालात 1 सप्टेंबर 2016 ते 31 मार्च 2023 या कालावधीतील 'महाराष्ट्रातील जिल्हा खनिज प्रतिष्ठान ट्रस्टसह प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेची अंमलबजावणी' च्या कामगिरी लेखापरीक्षणाचे परिणाम समाविष्ट आहेत. हे लेखापरीक्षण नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार आणि सेवाशर्ती) अधिनियम, 1971 आणि भारताच्या नियंत्रक व महालेखापरीक्षकांनी जारी केलेल्या लेखापरीक्षण आणि लेखा नियम, 2007 (2020 मध्ये सुधारित) च्या तरतुदींनुसार करण्यात आले आहे.

भारताच्या नियंत्रक व महालेखापरीक्षकांनी जारी केलेल्या लेखापरीक्षण मानकांनुसार कामगिरी लेखापरीक्षण करण्यात आले आहे.

**टिप: मूळ इंग्रजी अहवालावरून अनुवादित; शंका समाधानासाठी कृपया इंग्रजी अहवाल पहावा.**